विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील मुलामुलींना परदेशी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सन २०१८-१९ साठी विद्यार्थ्याची निवड करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : शिवृत्ती २०१८/प्र.क्र.११८/शिक्षण,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २४ जुलै, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग.क्र.शिवृत्ती-२०१८/प्र.क्र.११८/शिक्षण, दिनांक ११/१०/२०१८

२) शासन परीपत्रक,विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, क्र.शिवृत्ती-२०१८/प्र.क्र.११८/शिक्षण, दिनांक १२/११/२०१८

प्रस्तावना:-

विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित शिक्षण संस्थेत उच्च शिक्षणाची संधी मिळावी याकरीता सन २०१८-१९ पासून परदेशी शिष्यवृत्ती योजना वाचा क्र.१ येथे नमुद दिनांक ११ ऑक्टोबर,२०१८ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेली आहे.त्यानुसार सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,पुणे यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,पुणे यांच्या अध्यक्षतेखालील छाननी समितीमार्फत करण्यात आली. छाननी अंती **निखील प्रकाश जाधव** यांचा प्रस्ताव संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,पुणे यांनी शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला. तद्नुषंगाने राज्य निवड समितीच्या दि.०६/०७/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत शासनास प्राप्त प्रस्तावाची पडताळणी करण्यात आली.

२. उक्त पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी QS आणि THE यांच्या सरासरी २०० च्या आतील वर्ल्ड रॅन्कींग असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची निवड करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

परदेशी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गंत संदर्भीय दिनांक११ ऑक्टोबर,२०१८च्या शासन निर्णयान्वये मा. प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या राज्य स्तरीय निवड समितीने पात्र ठरविलेल्या विद्यार्थी (सोबत प्रपत्र-अ)व आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांची पूर्ततेच्या अधिन राहून निखील प्रकाश जाधव या विद्यार्थ्याला सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये खाली नमुद प्रपत्र "अ" मधील तपशीलानुसार परदेशातील विद्यापीठातील उच्च शिक्षणासाठी या शासन निर्णयान्वये शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येत आहे.

२. परदेशी शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्याला अनुज्ञेय शिष्यवृत्ती प्रदान करण्यासाठी संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी या शासन निर्णयान्वये परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्याकडुन शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेली हमीपत्रे घेवुन तसेच विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्रांची तपासणी करुनच संबंधित विद्यार्थ्यास अनुज्ञेय शिष्यवृत्ती मंजूर करण्याची कार्यवाही करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्यास शासन निर्णयात नमूद अभ्यासक्रम व कालावधीसाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे तसेच विद्यार्थ्याचे परदेशातील शिक्षण चालु असल्याच्या कालावधीत एखाद्या

विद्यापीठाच्या शिक्षण शुल्कामध्ये वाढ किंवा घट होत असल्यास, त्यानुसार देय शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे अधिकार संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान करण्यात येत आहेत.

३. ज्या विद्यार्थ्यास शासनामार्फत परदेश शिष्यवृत्ती मंजूर केली आहे, त्या विद्यार्थ्यानी त्यांचे शिक्षण संपल्यानंतर देशाची सेवा करणे व त्यांच्या ज्ञानाचा फायदा देशाला करुन देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने संबंधित विद्यार्थ्याकडून शिष्यवृत्ती मंजूर करण्यापूर्वी हमीपत्र (BOND) लिहून घेणे बंधनकारक राहील.

४. परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्याने परदेशातील पद्व्युत्तर पदवी किंवा पीएचडी अभ्यासक्रम विहित कालावधीतपूर्ण करणे आवश्यक आहे. त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यास मुदतवाढ वा वाढीव खर्च दिला जाणार नाही.

५. परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या संबंधित विद्यार्थ्यास उच्च शिक्षण घेण्यासाठी ज्या शैक्षणिक संस्था, विद्यापीठात अथवा अभ्यासक्रमास मान्यता दिलेली आहे, ते ठिकाण वा अभ्यासक्रम विद्यार्थ्याने परस्पर बदलल्यास संबंधित विद्यार्थ्याकडुन शिष्यवृत्तीची रक्कम संपूर्णत: वसूल करण्यात येईल.

६. शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या एकूण खर्चाच्या रकमेपैकी ज्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे, त्याला त्या वर्षाचे शुल्क, निर्वाह भत्ता व इतर अनुषंगिक खर्च यांची रक्कम संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संबंधित विद्यापीठाकडून प्रमाणित माहिती प्राप्त करुन घेऊन, शिक्षण फी संबंधित विद्यापीठास आणि निर्वाह भत्ता व अनुषंगिक खर्चाची रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावी.

७. याबाबत होणारा खर्च हा "मागणी क्रमांक झेडजी-०३, प्रधानशीर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण, ०३, मागासवर्गीयांचे कल्याण, २७७- शिक्षण, ०२ शिष्यवृत्ती विद्यावेतन, (०२)(१८) “विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परेदशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती” (२२२५ एफ २१८), " या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून त्या अंतर्गत चालू आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा. त्याकरीता संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

८. संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करताना शासन निर्णय क्रमांक शिवृत्ती-२०१८ /प्र.क्र.११८ /शिक्षण, दिनांक ११ऑक्टोबर, २०१८व शासन शुध्दीपत्रक क्रमांक शिवृत्ती-२०१८ /प्र.क्र.११८ /शिक्षण, दिनांक १२नोव्हेंबर, २०१८मधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१९०७३११६१६०२३६२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVINDRA VASANTRAO GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: CN = RAVINDRA VASANTRAO GURAV, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNEMENT OF MAHARASHTRA, OU = VJNT OBC AND SBC DEPT
Date: 2019.07.31 16:26:22 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर सचिव

३. मा.मंत्री,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
५. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव,मंत्रालय, मुंबई
६. मा.प्रधान सचिव, महसुल व वन/वित्त / नियोजन /ग्रामविकास/ गृह निर्माण/ उद्योग,उर्जा व कामगार/ उच्च व तंत्रशिक्षण/ माहिती व तंत्रज्ञान/ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये/ कृषी व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
७. मा.सचिव, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे स्वीय सहाय्यक मंत्रालय,मुंबई
८. महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई (प्रशिध्दीसाठी)
९. संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
१०. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण,मुंबई
११. सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण विभाग
१२. सर्व सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण विभाग
१३. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
१४. निवड नस्ती (शिक्षण)

(शासन निर्णय क्र.विजाभ, इमाव व विमाप्र कल्याण विभाग.क्र.शिवृत्ती-२०१८/प्र.क्र.११८/शिक्षण, दिनांक २४ जुलै,२०१९ चे सहपत्र)						
प्रपत्र-अ						
सन २०१८-१९ करीता विजाभज, इमाव व विमाप्र प्रवार्गतील विद्यार्थ्यांना परदेशशिष्यवृत्ती -निवड यादी						
अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	प्रवेशघेतलेल्या विद्यापीठाचे नाव	विद्यापीठाच्या देशाचे नाव	अभ्यासक्रम	परदेशातील विद्यापीठातील अभ्यासक्रमाचे नाव	अभ्यासक्रमकालावधी
१	२	३	४	६	७	८
१.	**निखील प्रकाश जाधव**	The University of Adelaide	Australia	व्यवस्थापन	Master of Applied Project Management	२ वर्ष

RAVINDRA VASANTRAO GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: CN = RAVINDRA VASANTRAO GURAV, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNEMENT OF MAHARASHTRA, OU = VJNT OBC AND SBC DEPT
Date: 2019.07.31 16:26:56 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन